# नववे विज्ञान लेखक शिबीर

पुणे 1993

# निबंध व चर्चा

संपादक :

अ. पां. देशपांडे

हाती घेतल्यास यश निश्चित मिळेल. साक्षरता मोहिमेसारखे एका वर्षात होणारे हे काम नाही. पण खेड्यातील वयोवृद्ध अशिक्षित नागरिक सुद्धा विज्ञान समजून घेण्यास उत्सुक आहे हे त्याच्या यशासाठी चांगले आहे.

'भारत विज्ञान जत्था' या स्वरुपात संपूर्ण देशभर प्रयत्न करण्यात आला. परंतु साक्षरता अभियानाच्या तुलनेत खर्च व मनुष्यबळ फारच कमी होते. त्यामुळे त्याचा कितीसा प्रत्यक्ष परिणाम झाला हे सांगणे कठीण आहे. पण साक्षरता अभियानासारखे त्याला महत्त्व दिले असते तर निश्चितच फायदा झाला असता.

## वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या निमित्ताने

### सूचना

वयाच्या सातव्या वर्षापर्यंत मुलाला जे सांगितले जाते ते त्याच्या मनात खोलवर रुजून बसते. अंधारातून बुवा येईल म्हणून लहान मुलाला भीती घातली जाते. थोडा मोठा झाल्यावरही तो पोट दुखते किंवा अन्य कारणाने बाहेर जायचे टाळतो. खरे म्हणजे पोट दुखत नसते तर त्या बुवाचीच भीती असते.

---

## अध्यक्षीय भाषण

## 2.3 वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार

— डॉ. जयंत नारळीकर

हा विज्ञान लेखकांचा मेळावा आहे. समाजात अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा आहेत. त्या लेखक आपल्या लेखणीद्वारे दूर करू शकतात. जे दूरदर्शन वा आकाशवाणीचे लेखक आहेत, ते, ज्यांना वाचता येत नाही अशा लोकांच्या मनातील अंधश्रद्धा आपापल्या कार्यक्रमांच्या माध्यमातून दूर करू शकतात.

'स्केप्टीकल इन्कायरर' या नावाच्या अमेरिकेतील नियतकालिकात अंधश्रद्धांबद्दल नेहमी चर्चा केली जाते. ज्यांना शक्य असेल त्यांनी हे मासिक घेऊन वाचावे. फलज्योतिषापासून उडत्या तबकड्यांपर्यंतच्या अनेक विषयांबद्दल त्यात चर्चा असते.

उडत्या तबकड्यांबद्दल मला अनेक पत्रे येतात. मी अमूक वाजता अमूक गावाहून उडती तबकडी येताना पाहिली. ती परग्रहावरून आली होती वगैरे. आजपर्यंत जगात अशी उडती तबकडी खऱ्या अर्थाने कोणी पाहिली नाही.

स्केप्टीकल इन्कायरर मध्ये फलज्योतिषाबद्दल खूप चर्चा येते. पण ते पाश्चात्य फलज्योतिष आहे. जर आपल्याला वाटत असेल की आपले फलज्योतिष अधिक प्रगल्भ आहे तर असा एक प्रयोग करण्यासारखा आहे, जो या मासिकाने केला. लग्नानंतर घटस्फोट घेतलेली जोडपी आणि सुखाने संसार करणारी जोडपी यांच्या कुंडल्या घेऊन त्या काही फलज्योतिषांकडे दिल्या व त्यावरून त्यांना कोणत्या जोडप्यांची लग्ने यशस्वी आणि कोणती अयशस्वी हे शोधून काढायला सांगितले. पण तो प्रयोग फसला आणि ज्योतिषांना ते काही योग्यरित्या सांगता आले नाही. यावरून असे दिसते की कुंडल्या पाहून लग्ने ठरविली जातात त्यातही तथ्य नाही.

लहान मुलांसाठी जादूगार सरकारांनी रसायनशास्त्र व इतर शास्त्रांच्या मदतीने जे जे जादूचे प्रयोग केले ते समजावून दिले आहेत. ते सर्वांनी वाचले तर चमत्कार आपोआप होतात यावर किंवा एखाद्या पुरुषाला सिद्धी प्राप्त झालेली असते आणि त्यावरून तो चमत्कार करू शकतो अशा गोष्टींवर कोणी विश्वास ठेवणार नाही.

गेल्या 20 वर्षात खूप फरक पडला असे म्हणतात. ते कदाचित ज्ञान खूप वाढले आहे म्हणून असेल. पण आजच्या विद्यार्थी वर्गावर लक्ष वेधले आणि त्यांना योग्य माहिती दिली तर पुढील पिढी अंधश्रद्ध होणार नाही. त्यासाठी आणखी 20 वर्षे वाट पहावी लागेल. त्याचा आणखीही एक फायदा होईल की हे विद्यार्थी मोठे झाल्यावर आपल्या आईवडिलांना त्यांच्यातील अंधश्रद्धा काढून टाकायला मदत करतील.

भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायात श्रीकृष्ण शेवटी सांगतो की जे खोलवरचे ज्ञान आहे. गुप्तात गुप्त ज्ञान आहे. ते मी तुला सांगितले. त्यावर तू स्वतंत्रपणे विचार कर आणि योग्य ते कर. मला वाटते, वैज्ञानिक दृष्टिकोन पसरवताना आपली भूमिका फार आग्रही असू नये. पण आपली भूमिका मांडून लोकांना विचार करायला संधी आणि स्वातंत्र्य द्यावे.